REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# छत्रपती शाहू महाराजांची इनामे - एक दृष्टीक्षेप

**प्रा. डॉ. रमेश धनराज जाधव**
**इतिहास विभाग प्रमुख, आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे.**

**प्रस्तावना :**



शाहु महाराजांची ८ मे १७०७ मोगलांच्या कैदेतून सुटका झाली स्वराज्यात आल्यामुळे महाराणी ताराबाई-शाहू महाराज यांच्यामध्ये सत्तेसाठी संघर्ष निर्माण झाला आणि त्यातूनच खेडची लढाई झाली त्यात महाराणी ताराबाईंचा पराभव झाला. त्यामुळे शाहू महाराजांनी आपला मोर्चा साताऱ्याकडे वळविला. शाहूंची बाजू भक्कम झालेली पाहून सातारा लढविण्याची कामगिरी प्रतिनिधींकडे सोपवून महाराणी ताराबाई पन्हाळ्याकडे निघून गेल्या आणि शाहूमहाराजांनी सातारा राजधानी आपल्या ताब्यात घेवून १२ जानेवारी १७०८ रोजी स्वतःस राज्याभिषेक करुन मराठा साम्राज्याचा वारस घोषित केले.[१]

छत्रपती राजारामाच्या काळात तत्कालीन राजकीय परिस्थितीनुसार राजकीय व लष्करी अनुषंगाने वतने देण्यास सुरुवात केली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्ता प्राप्तीनंतर (१७०८) मराठा राज्यातील विविध ठिकाणी असलेले सरदार, सरंजामदार, दिमतीस असलेले कारभारी यांना मोकासे,इनामे देण्यास सुरुवात केली. मोल्वर्थ मराठी-इंग्रजी शब्दकोषात पुढीलप्रमाणे आहे.

१. Village or lands, or a share in the rule over than and revenue arising from then, granted on condition of Millitary Service or in India. २. The share of the state or government in the rule over a village and in the revenue.[२] लष्करी सेवेबद्दल व त्या खर्चासाठी विशिष्ट गावातील महसुल वसुलीचा तो अधिकार होता.

**उद्देश :**

१) छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील इनामे यांची माहिती मिळविणे.
२) इनामे देण्याच्या उद्देशाची माहिती मिळविणे. इनामे कोणकोणत्या व्यक्तीस दिली होती यांची माहिती मिळविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला असून उपलब्ध असणारी संदर्भग्रंथे त्यांत प्रामुख्याने मराठी रियासत, वैद्य दप्तरातून निवडलेले कागद- खंड-२, शाहू महाराजांची रोजनिशी, पेशवेदप्तरातील सनदा पत्रातील माहिती या संदर्भग्रंथाचा उपयोग करुन प्रस्तुत शोधनिबंध मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय विवेचन :**

**सनदा व आज्ञापत्रे :** सनद याचा अर्थ अधिकारपत्र किंवा देणगीपत्र असा होत असला तरी त्यापेक्षाही व्यापक असल्याने त्याचे स्पष्टीकरण करणे जरुरीचे असून योग्यही आहे.[३] छत्रपती शिवाजी महाराजांना अष्टप्रधान मंडळाची नेमणूक का करावी लागली. याचे महत्वाचे कारण म्हणजे राज्यकारभार चालविण्यास लागणाऱ्या मनुष्यबलाची व ज्ञानबलाची योग्य ती तजवीज केलेली दिसते. कोणाला लढाईचे तर कोणाला न्यायाचे, कोणाला फडणविशीचे तर कोणास चिटणिसीचे व मुजूमदारीचे वैगेरे कामे करता येतील हे पाहून योग्य व्यक्तीची निवड केली व अंगी असलेल्या बुद्धी चातुर्य दाखविण्यासाठी आणि राष्ट्रहिताचे कामे करण्यास संधी देवून त्या त्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली.[४] त्या कामाच्या बदल्यात एखाद्यास गावाचे उत्पन्न इनाम करुन दिले तर, एखाद्यास खजिन्यातून नगद नेमणूक करुन दिली. काही बाबतीत धार्मिक वृत्तीनेही देवस्थानास किंवा ब्राह्मणास काही गावे व जमिनी इनाम करुन दिल्या. यासंबंधीची जी पत्रे त्यांनी करुन दिली त्यासच 'इनामपत्र' असे म्हणतात.[५]

छत्रपतींनी सनदांची अंमलबजावणी करण्याकरिता काढलेली पत्रे ही आज्ञापत्रे असतात. 'आज्ञापत्र' ही खरी सनद नव्हे. तर सनद म्हणजे ज्यास इनाम देणगी द्यावयाची त्याच्या नावे छत्रपतींनी लिहून दिलेले जे पत्र ती मूळ सनद होय.[६] सनदेची व आज्ञापत्राची भाषा थोडी वेगळी असते. ज्या व्यक्तिस इनामपत्र द्यावयाचे त्याच्या मूळ सनदेत 'मोकासा इनाम दिला असे' आणि या वाक्यापुढे 'तरी तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरेपरेने अनभऊन सुखरुप राहणे' असा मजकूर असतो व शेवटी पाा हूजूर मोर्तबअसे ही वाक्ये असतात.[७]

आज्ञापत्रात अंमलबजावणीसाठी गावचे पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे किंवा कामकामगर यांना लिहलेला असतो. तर तुम्ही मौजे मजकुरास ताकीद करु यास व याच्या पुत्रपौत्रादि वंशपरपरेने इनाम चालविणे.----------[८]

## जमीन इनाम :

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात ज्या स्वामीनिष्ठ सेवकांनी छत्रपती शाहू महाराजांची सेवा निष्ठेने केली होती. त्यामूळे त्यांना किंवा त्यांच्या परिवारातील सदस्यांना त्या सेवेबद्दल जमीन इनाम दिल्याचा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रातून मिळतो.

शाहू महाराजांच्या सेवेत असलेला तुकोजी गायकवाड हा शिलेदार महीमान गडाजवळ मुक्कामी असतांना शत्रूने हल्ला केला असता त्यांचा शत्रूशी संघर्ष झाला त्या संघर्षात ते ठार झाले. त्यानंतर त्यांचे वडील संभाजी गायकवाड यांनी तुकोजीने गाजविलेल्या पराक्रमाबद्दल त्यास इनाम जमीन मिळावी अशी विनंती छत्रपती शाहू महाराजांकडे केली असता छत्रपती शाहू महाराजांनी संभाजी गायकवाड यास पावचाहूर जमीन इनाम म्हणून दिली ती जमीन त्यांच्या पुत्रांनी वंशपरंपरेने इनाम म्हणून चालवावी म्हणून इनामपत्र देण्यात आले.[९]

छत्रपती शाहूंच्या दरबारात सैददावल हकीम हे वैद्यक म्हणून वैद्यकीय सेवा करित होते म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांच्या निष्ठापूर्व सेवेबद्दल मौजे एणेगाव तर्फ उमरज प्रांत कराड येथे काही जमीन वंशपरंपरेने चालविण्यासाठी इनाम दिली होती.[१०]

वेदमूर्ती विठ्ठल भट हे छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यात भला मोठा ब्राह्मण असून वेदपारायण करण्यात दिग्गज होता. त्यांनी खानदेश प्रांतातील सरकार बिजागड मधील चंभू येथे येवून विनंती केली की आपणास काही जमीन इनाम म्हणून द्यावी अशी विनंती केली असतात. स्वामींनी त्यास एक कूटूंब वत्सल वेदपारंगत ब्राह्मण असून ह्यांच्यावर खूष होवून त्यास मुंजेरी येथील एक चावर जमीन विठ्ठल भट इनाम म्हणून दिली.[११]

साबाजी भोसले हे राज्यातील एक पुरातन सेवक होते. जेव्हा छत्रपती शाहू महाराज हे मोगलांच्या कैदेतून सुटून इ.स. १७०८ मध्ये दक्षिणप्रांती आले. त्यासमयी खानदेशात साबाजी भोसले यांनी स्वामींची सेना समुदायानिशी एकनिष्ठतेने सेवा केली. त्यावर स्वामी खूष होवून त्यांनी साबाजी भोसले यास मौजे विकाखडोली तर्फ मसूर येथील जमीन वंशपरम्परेने इनाम देण्यात आली.[१२]

छत्रपती शाहू महाराजांच्या काळात प्रांत पुणे मध्ये पाच तर्फ व एक कर्यात या उपविभागाचा समावेश होता असे दिसून येते. त्यात प्रामुख्याने तर्फ हवेली, तर्फ सांडस, तर्फ निरथडी, तर्फ कऱ्हेपठार, तर्फ पाटस व कर्यात सासवड, त्याकाळात प्रांत पुणे अंतर्गत २४४ गावांचा समावेश होता.[१३]

तर्फ हवेली व पुणे शहर व परिसराचा भाग होता. या अंतर्गत ६२ गावे असल्याचे उल्लेख आढळतो. या ६२ गावापैकी १४ गावे इनाम, ४४ गावे मोकासा व ४ गावे शासनाच्याकडे म्हणजे खाजगीकडे होती. त्यात इनाम असलेली गावांचा तपशिल आपणास पुढील प्रमाणे नमूद करता येईल. चिंचवड- श्रीदेव, देहू, कळससह दोन गावे, विश्वनाथ जोशी सईसकर- निगरी श्रीदेव- रावते, धनाजी जाधव- माजरी, श्रीदेव भोद, पिरजादे एरंडवणे इत्यादींचा समावेश होता.[१४]

तर्फ सांडसात ४९ गावांचा समावेश होता. यापैकी ४ गावे इनाम, ३९ गावे मोकासा व ६ गावे खाजगीकडे [१५] त्याचप्रमाणे तर तर्फ कऱ्हेपठारात ४३ गावांचा अंतर्भाव होता. यापैकी १० गावे इनामी असून , २८ गावे मोकासा, तर ६ गावे खाजगीकडे असल्याची माहिती कागदपत्रातून मिळते. इनामामध्ये श्री देवचिंतामणी -थेऊर, श्रीदेव साष्टे, ब्राह्मणअग्रहार क्षेत्र- तुळापर इत्यादी.[१६]

कर्यात सासवड मध्ये १० गावांचा समावेश होता. त्यापैकी चार गावे इनाम तर ५ गावे मोकासा होती. इनाम गावे- राजश्री, पंतसचिव- सासवड, पिलाजी जाधव- दिवे तर सोनठाकूर- कोठीन बु. व खळद याप्रमाणे दिली होती. त्यात इनामगावे पिलाजी जाधव- दिवे, राजश्रीपंत सचिव- सासवड, सोनठाकुर- कोठीत बु. याप्रमाणे दिली होती.[१७]

अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांना स्वामीनिष्ठ सेवकांना जमीन व गावे इनाम दिलेले दिसून येते.

## सारांश :

शाहु महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी स्वतःला राज्याभिषेक करुन साताऱ्याची सत्ता आपल्या हाती घेतली त्यानंतर त्यांनी स्वामिनिष्ठ सेवकांना जमिनी व गावे इनाम दिल्या त्यात प्रामुख्याने संभाजी गायकवाड, वैद्यसैद दावल हकीम, वेदमूर्ती विठ्ठलभट, साबाजी भोसले पुणे प्रांतातील काही गावे इनाम व मोकासा दिलेली होती असे दिसून येते. सनदा व आज्ञापत्रे यांना राजपत्रे म्हणत असे. सनद याचा अर्थ 'अधिकारपत्र अथवा देणगीपत्र' होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभार चालविण्यासाठी योग्य व्यक्तीची निवड केली व अंगी असलेल्या बुद्धीचातुर्य दाखविण्यासाठी आणि राष्ट्रहिताची कामे करण्यास संधी देवून त्या कामाच्या मोबदल्यात एखाद्यास गावाचे उत्पन्न इनाम करुन दिले तर एखाद्यास खजिन्यातून नक्त नेमणूक करुन दिली. काही बाबतीत धार्मिक वृत्तीनेही देवस्थानास ब्राह्मणास जरी जमीनी व गावे

इनाम करुन दिली. छ. शिवाजी महाराजांनी नंतरच्या काळात वतने देणे बंद केले होते. परंतु छ. राजारामाने पुन्हा वतने देण्याची परंपरा सुरु करावी लागली तिच परंपरा छ. शाहूंनी देखील सुरु ठेवलेली दिसते.

**संदर्भ :**


१) गर्गे स.मा. (संपादक)- मराठी रियासत खंड-३, मुंबई, १९८९, पृष्ठ क्रं. ६९.
२) सिरसाठ अर्जून- छत्रपती शाहूकालीन प्रांत पुणे मधील इनामे व मोकाक्षे- अखिल महाराष्ट्र इतिहास परिष्द- संशोधन पत्रिका- २०१६, पृष्ठ क्रं. ११०.
३) वैद्य शंकर लक्ष्मण- वैद्य दप्तरातून निवडलेले कागद, खंड-२, पुणे, १७४०, पृष्ठ -३.
४) उपरोक्त
५) उपरोक्त
६) उपरोक्त
७) उपरोक्त, पृष्ठ क्रं. ४
८) उपरोक्त, पृष्ठ क्रं. ४
९) वाड. ग.ची. - द.बा. पारसनिस (संपादक)- इतिहास संग्रहात प्रसिद्ध झालेली एलिनेशन ऑफीस पूणे, सरकारी कागदपत्रातील निवडक उतारे पेशवे दप्तरातील सनदापत्रातील माहिती, पत्र क्रं. १८, श्री. शाहु राजे व त्यांचे पुढील कारकिर्द- मुंबई- १९१७.
१०) वाड. ग.ची. - शाहू महाराजांची रोजनिशी, भाग-१, सनद नं. ३५९
११) उपरोक्त- वाड. ग.ची. - पेशवे दप्तरातील सनदा पत्रातील माहिती, पत्र क्रं. १९
१२) जाधव रमेश- साताऱ्याच्या छत्रपतींच्या राजदरबारातील सांस्कृतिक जीवन (लघुशोधप्रबंध- RO Pune, २०१०-२०१२, पृष्ठ क्रं. २३)
१३) उपरोक्त - सिरसाठ-पृष्ठ क्रं. १००
१४) उपरोक्त - पृष्ठ क्रं. १११
१५) उपरोक्त
१६) उपरोक्त
१७) उपरोक्त- पृष्ठ क्रं. ११३
१८) जाधव रमेश- उपरोक्त